प्रकरण पहिले

# १९६० नंतरची चरित्रात्मक कादंबरी

## प्रकरण पहिले

# १९६० नंतरची चरित्रात्मक कादंबरी

मराठी साहित्य हे विविधतेने नटलेले व समृद्ध असलेले क्षेत्र आहे. मराठी वाङ्मय क्षेत्रात असे अनेक वाङ्मय प्रकार आहेत की, ज्यांनी मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले. या वाङ्मय क्षेत्रात समाविष्ठ असलेला चरित्र कादंबरी हा त्यातील एक प्रकार आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये १९६० नंतरच्या चरित्रात्मक कादंबरीचा आढावा घ्यावयाचा आहे.

मराठी साहित्यात कादंबरीचे अनेक प्रकार पहावयास मिळतात. चरित्रात्मक कादंबरी हा एक कादंबरीचा प्रकार आहे. तसे पाहिले तर वाङ्मयाच्या सर्व प्रकारात चरित्र हा प्रकार व्यापला आहे. कारण चरित्र हे माणसाशी निगडीत असते आणि कथा कादंबरी नाटक यातील पात्रे ही माणसेच असतात किंबहूना त्यांनी भोगलेल्या जीवनाचा सार असतो अनेक कादंबरीकार आपल्या अवती भोवती पाहिलेल्या व्यक्तिंना कादंबरीचा नायक बनवतात. उदाहरण द्यायचे झाले तर 'गारंबीचा बापू' किंवा 'बॅरिस्टर' नाटकातील बॅरिस्टर याशिवाय महाभारतातील कौरव पांडव तसेच रामायणातील रामाचे चरित्र पण असे असूनही चरित्राला वाङ्मयाचाच पण स्वतंत्र प्रकार मानला जातो. कारण कथा, कादंबरी किंवा नाटकामध्ये केवळ एकाच व्यक्तिचे चित्रण केलेले नसते तर त्यामध्ये अनेक दुय्यम व्यक्तिही असतात. तसेच त्यांना रेखाटताना लालित्याची किंवा अलंकारिक भाषा वापरली जाते. कधी कधी नायक हे काल्पनिक असतात. त्यांचे रेखाटन अतिरंजीत असते असा प्रकार मात्र चरित्रामध्ये नसतो म्हणूनच चरित्र हा प्रकार एकूण साहित्यातून वेगळा मानला जातो.

''चरित्रात्मक कादंबरी' हा वाङ्मय प्रकार कादंबरी आणि चरित्र या मूळ वाङ्मय प्रकारामधून जन्माला असल्याने चरित्रात्मक कादंबरी हे नाव योग्य ठरते.''[१] तसे पाहिले तर अशी कादंबरी लिहिणे म्हणजे कठीणच असते. कारण चरित्रामध्ये ऐतिहासिकता ही असते आणि चरित्रही असते. परंतु ऐतिहासिक कादंबरीप्रमाणे यामध्ये अद्‌भूतरम्यता व कल्पनारम्यता नसते तर जे सत्य व वास्तव आहे. त्याचेच चित्रण चरित्र कादंबरीत होत असते.

'चरित्र आणि आत्मचरित्र' हा जुळा वाङ्मय प्रकार आहे. दोन्हीमधून व्यक्तिदर्शन होते. आत्मचरित्र हे स्वत: लिहिलेले असते. तर चरित्र हे एखाद्या लेखकाला भावलेल्या

व्यक्तिमत्त्वावर लेखन करावे असे वाटते वर्ण्य व्यक्ती इतरानांही माहित असते. ती धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची असते. पण त्या व्यक्तिचे आणखी काही पैलू इतरांसमोर मांडावे असे वाटत असल्याने चरित्रकार अशा व्यक्तिंची चरित्रे लिहित असतो.

चरित्र आणि आत्मचरित्र हा एक ललितेतर वाङ्मय प्रकार प्राचीन काळापासून मराठीत समृद्ध आहे. चरित्र आणि कला या दोन गोष्टींना साखेच महत्त्व देता येत नाही. गंगाधार गाडगीळ यांनाही चरित्रात्मक कादंबरी हा शुद्ध साहित्यप्रकार वाटत नाही ते म्हणतात, 'चरित्रात्मक कादंबरी हा वास्तवाधिष्ठित साहित्याचा पुढचा टप्पा आहे. पण हा टप्पा इतका दूरचा आहे की या प्रकारच्या कादंबरीला शुद्ध साहित्य न मानता संकरीत साहित्य मानले पाहिजे. याच कारण असं की, चरित्रात्मक कादंबरीचा लेखक स्वत:वर अनेकविध आणि मूलभूत बंधन घालून घेतो. ज्या बहुविध प्रकारची निर्मिती लेखक स्वतंत्र कादंबरी लिहिताना करीत असतो तशी करण्याचे स्वातंत्र त्याला इथे राहत नाही' [२]

चरित्रात्मक साहित्यकृत्ती हा शुद्ध साहित्यप्रकार नाही कारण चरित्र हे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचे काही ठरावीक साधन सामुग्रीच्या आधारे संकलित केलेले असते. त्यात लेखकाची कल्पना शक्ती असते त्यातील सत्य, असत्य चरित्रकार व चारित्रनायक या दोघांनाच माहित असते. त्यामुळे डॉ. सदा कऱ्हाडे यांना चरित्रात्मक कादंबरी चरित्र लेखनातील समस्या वाटते.

डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, 'कादंबरीकाराला असलेले स्वातंत्र्य चरित्रकाराला नसूनही चरित्र हे वाचनीय परिणामकारक व्हावे यासाठी चरित्रकार कादंबरीतील लेखन प्रवृत्तीचे अवलंबन करतो. पण त्यात समतोल जर राखला गेला नाही तर चरित्र कादंबरी होण्याचा धोका असतो. ही जाणीव चरित्रकाराला असते आणि त्यातूनच एक संकरीत वाङ्मय प्रकर जन्माला येतो ज्याला आपण सामान्यत: चरित्रात्मक कादंबरी असे म्हणतो. 'चरित्र' आणि कादंबरी या दोन्ही वाङ्मयप्रकाराचा समन्वय त्यात साधलेला असतो. या संकरीत वाङ्मय प्रकारात कादंबरी आणि चरित्रकार या दोघांचीही सोय आहे. चरित्राला कादंबरीचे रूप देता येते पण कादंबरीला चरित्राचे रूप देता येत नाही.'[३]

'चरित्र हा वाङ्मय प्रकार नुसता स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे. असे नव्हे तर ललित आणि ललितेत्तर वाङ्मय यांच्या सीमारेषावर असणारा वाङ्मय प्रकार आहे. ' हे. ग. का. रावते यांचे म्हणणे योग्य आहे.[४]

चरित्र हा व्यक्तिप्रधान लेखन प्रकार आहे या मध्ये चरित्रकार व्यक्ति चित्रणावर भर देत असतो. यादृष्टीने वसंत रामचंद्र बोरगांवकर म्हणतात, 'एखाद्या विशिष्ट म्हणजे आगळे जीवन जगलेल्या व्यक्तींच्या जीवनातील घटनांचे कालानुक्रमे निवेदन करीत असताना व्यक्तिजीवनाचा व त्या व्यक्तिमत्त्वाचा साकल्याने जीवंत प्रत्यय देणाऱ्या लेखनाला चरित्र म्हणता येईल.'[५]

चरित्रामध्ये चरित्रनायकाची जीवन कथा बरीक सारीक तपशीलासह येत असते. तर चरित्रात्मक कादंबरीत चरित्र कादंबरी व इतिहास हा एकजीव होऊन व्यक्त होतो. चरित्राप्रमाणेच चरित्रात्मक कादंबऱ्या समाजाला प्रेरणादायी ठरत असतात.

१९६० नंतरच्या काळात मराठी कथा, कादंबरी, कविता नाटक या साहित्य प्रकाराच्या तुलनेत चरित्रांची संख्या कमी आढळते पण केवळ चरित्रांचा स्वतंत्रपणे विचार केला तर मात्र ही संख्या लक्षणीय आहे. सर्वसामान्यपणे आपल्या ज्या व्यक्तिबद्दल आदर वाटतो. ज्यांच्या कार्याचा आपल्याला अभिमान वाटतो, ज्यांनी समाजाला प्रगल्भ बनविले आहे. ज्यांचा आदर्श घ्यावा, असे वाटते अशा व्यक्तिंची चरित्र या काळत लिहिली.

महापुरुषांच्या संदर्भात बऱ्याचवेळा अवास्तव माहिती पसरलेली असते.आपल्याकडे ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास तसेच शिवाजी महाराज यांच्या मागे दैवी कथा रचल्या जातात. अशावेळी हे थोरपुरुष एक मानव म्हणून ओळख करून देण्याचे कार्य या काळात झाले. या काळातील संत चरित्रांचा विचार करताना संत ज्ञानेश्वर ते रामदास यांच्या पर्यंतच्या संताची चरित्रे लिहिली गेली. परंतु संत रोहिदास हे चांभार जातीत जन्मलेल्या संत कविचे चरित्र आतापर्यंत मराठीत नव्हते ते या चरित्राने भरून काढले. तसेच स्त्री संत चरित्रेही या काळात लिहिली गेली आहेत. त्यामध्ये संत जनाबाई, संत तुकारामांची शिष्या यांचाही समावेश या चरित्रामध्ये येतो. त्याचप्रमाणे मुसलमान संत कवी सुद्धा या काळाला अपवाद नाहीत.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१९६० नंतरच्या चरित्रग्रंथाकडे पाहिल्यास राजकीय व सामाजिकक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची चरित्रे लिहिली गेली. त्याचप्रमाणे जन्मशताब्दी सारख्या निमित्ताने लिहिली गेली आहेत. या काळातील चरित्र कादंबरी ही समाजकारण, राजकारण धर्मकारण या बरोबर साहित्य, विविध खेळ, संशोधन क्षेत्र, शास्त्र, उद्योग, कला, संगीत, नाट्य, चित्रपट अभिनय या सारख्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाचा मागोवा या काळात चरित्राकारांनी घेतला. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यपूर्ण काळातील अनेक नेते या काळाचे चरित्र विषय ठरले आहेत. मात्र या काळातील ही चरित्रे पाहता या काळात उपलब्ध झालेल्या माहितीपेक्षा १९६० नंतरच्या काळात उपलब्ध माहिती अधिक सखोल व खरी असल्याचे समजते. तसेच या काळात किशोरवयीन मुलांना प्रेरणा, स्फूर्ती मिळावी या हेतूने तसेच महान नेत्यांबद्दल मुलांच्यामनात आदरभाव निर्माण व्हावा या हो कारणांनी चरित्र लेखन केले गेले.

या काळातील चरित्र कादंबरी लेखनात स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक महत्त्वाचे नेते चरित्राचे विषय झाले आहेत. त्यामध्ये राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री हे चरित्रनायक ठरले आहेत. १९६० नंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. सहकार युग आले. उद्योगधंद्याचा विकास झाला. औद्योगिक क्षेत्रास हातभार लावणारे लक्ष्मणराव किर्लोस्कर, कल्याणी वालचंद हिराचंद व तात्यासाहेब कोरे या सारख्या अनेक उद्योजकांची चरित्रे लिहिली गेली आहेत. त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रातील क्रिकेटपटू, गिर्यारोहक, जलतरणपटू यांची देखील चरित्रे या काळात लिहिली गेली. याचबरोबर नाट्य, चित्रपट, कला, शिल्प संगीत या क्षेत्रात काम करणाऱ्या मातब्बर कलावंताची चरित्रे तसेच अनेक साहित्यिकांची चरित्रे या काळात लिहिली गेली आहेत. तसेच ती दर्जेदार ठरली आहेत.

चरित्र कादंबरीचे पौराणिक, ऐतिहासिक, चरित्रात्मक कादंबरी असे प्रकार पडतात. ऐतिहासिक कादंबरीत इतिहासातील व्यक्तिरेखा जशाच्या तशा रंगविण्याचा रणजित देसाई यांनी यशस्वी प्रयोग केला. यामध्ये 'स्वामी' ही कादंबरी (१९६२) मध्ये लिहिली या कादंबरीत रमा-माधवाच्या भाव जीवनाची उदात्त कहाणी येते. पानिपतचे युद्ध झाल्यावर राज्याची राजकीय घडी विस्कटली होती. याच पार्श्वभूमीवर लहान वयातच माधवरावांनी पेशवाई सावरली याचे चित्रण या कादंबरीत आले आहे. तर श्रीमान योगी (१९६८) रणजित देसाई यांनी या कादंबरीतून छत्रपती शिवरायांच्या आदर्श राज्यकाराभाराचे चित्रण केले आहे.

त्याचप्रमाणे ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबरी लेखन करणारे ना. सं. इनामदार यांनी 'झेप' (१९६३) या कादंबरीतून इनामदार त्रिंबकजी डेंगळे यांचे जीवनदर्शन घडवितात. या कादंबरीनंतर इनामदार यांनी 'झुंज' (१९६६) ही कादंबरी लिहिली. यामधून यशवंतराव होळकरांच्या अखंड झुंजीचे दर्शन घडविले आहे. तर 'मंत्रावेगळा' (१९६४) या कादंबरीतून दुसरा बाजीराव यांचे व्यक्तिदर्शन घडविले आहे. बाजीराव हे समाजाला पळपुटे वाटतात पण या कादंबरीने त्यांची बदनामी थांबविली आहे आणि इनामदार यांनी बाजीराव तसा नव्हता हे दाखवून दिले आहे.

याच काळात पौराणिक चरित्रात्मक कादंबरीची नवी परंपरा वि. स. खांडेकर यांनी घालून मराठी साहित्यातील चरित्र कादंबरीमध्ये मोलाची भर घातली आहे. खांडेकरांनी 'ययाती' (१९५९) मध्ये लिहिलेल्या या चरित्र कादंबरीमधून ययातीच्या रुपाने ययातीची कामकथा आपल्या समोर आली आहे. त्यानंतर शिवाजी सावंत यांनी (१९६७) मध्ये 'मृत्युंजय' ही कादंबरी लिहिली. पात्रमूखी अशी ही कादंबरी असून ती कर्णाची भावकथा आहे. तसेच 'राधेय' (१९८६) ही रणजित देसाई यांनी लिहिलेल्या चरित्रात्मक कादंबरीमधून कर्णाचे म्हणजेच राधा व अधिरथ या जोडप्याने सांभाळ केलेल्या राधेयाचे चित्रण आले आहे.

राष्ट्रपुरुषावरील चरित्रात्मक कादंबरी ही स्वातंत्र्य पूर्व काळापेक्षा १९६० नंतरच्या काळात अस्सल व खरी असल्याचे जाणवते. अशा कादंबऱ्यांनीही मराठी साहित्यात एक नवी परंपरा निर्माण केली. 'यज्ञ' (१९६८) या कादंबरीमधून भा. द. खेर व शैलजा राजे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार घडविला आहे.

१९६० नंतरचा काळ हा औद्योगिकरणाचा काळ म्हणून ओळखला जातो या काळात शेती, उद्योगधंद्यांना चालना मिळाली. यातून अनेक यशस्वी उद्योजकांची चरित्रे लिहिली गेली. परंतु त्यांची संख्या तुलनेने कमी आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून या काळात विविध क्षेत्रातील विविध व्यक्ति चरित्र विषय ठरल्या आहेत. थोर पुरुषांची चरित्रे अनेक लेखकांकडून विविध अंगानी लिहिली गेल्याचे दिसून येतात ही चरित्रे या काळातील अन्य कर्तृत्व संपन्न व्यक्तिंची लिहिली गेलेली चरित्रे अत्यंत अभ्यासनीय आहेत. प्रतिनिधीक स्वरूपात या काळातील काही महत्त्वाच्या उल्लेखनीय चरित्रांचा विचार पुढीलप्रमाणे :

## १९६० ते १९७५ या काळातील चरित्र कादंबरी

१९६० नंतर चरित्रात्मक कादंबरीलेखनास गती मिळाली या काळात अनेक चरित्रकारांनी आपली लेखनी सरसावली रविंद्रनाथ जीवनकथा (१९६१) हे ग. दे. खानोलकर यांनी रविंद्रनाथ टागोर यांच्या जीवनावर चरित्र लेखन केले. त्यामधून त्यांनी त्यांच्या जीवनकार्याचा वेध घेतला आहे. हा चरित्रग्रंथ त्यांनी टागोरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने लिहिला असून हे चरित्र लेखन वैशिष्ट्ये पूर्ण आहे. रविंद्रनाथांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने अन्य लेखकांनीही लेखन केले आहे. त्यामध्ये वि. स. सुखटणकर यांनी 'शांतीनिकेतन' या शिर्षकाचे चरित्र लिहिले आहे.

तसेच या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर डॉ. धनंजय कीर यांनी चरित्र लेखन केले असून हे चरित्र मराठी चरित्र वाङ्मयाला बळकटी प्राप्त करणारे आहे. या चरित्रातून आंबेडकरांचे संपूर्ण जीवन व कार्यकर्तृत्व, त्यांच्या क्रांतीकारक विचारांचा मागोवा कीर यांनी घेतला आहे.

याच काळातील आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे न. र. फाटक यांनी लिहिलेले 'आदर्श भारत सेवक' या चरित्रलेखनातून न. र. फाटक यांनी चरित्रनायक गोपाळकृष्ण गोखले यांच्या स्वभावगुणांचे तसेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे दर्शन घडविले आहे. यांची साधी रहाणी काटकसरीपणा मनमिळावू वृत्ती, चिंतनशील स्वभाव इत्यादी गुणांचे दर्शन लेखकाने घडविले आहे.

या काळातील उल्लेखनीय चरित्र म्हणजे धनंजय कीर यांनी चरित्र नायक महात्मा फुले यांच्या जीवनाचा शोध घेतलेले 'महात्मा फुले' या शीर्षकाचे चरित्र होय. यामधून महात्मा फुले आणि तत्कालिन परिस्थिती यांचा मागोवा घेतला. हा काळ म्हणजे कर्मठ सनातनी विचारांचा होता. या वादळी विचारांचा महात्मा फुले यांच्यावर कसा परिणाम झाला याचा शोध या चरित्राने घेतला आहे.

या काळातील आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे मंत्रावेगळा हे ना. स. इनामदार यांनी दुसरा बाजीराव पेशवा यांच्या जीवनावर लिहिले असून या चरित्रातून पेशवेकाळात त्यांची कशी शोकांतिका झाली यांचा सविस्तर तपशील दिला आहे.

१९६८ मध्ये वि. स. वाळिंबे यांनी दोन चरित्र कादंबऱ्या लिहिल्या त्या म्हणजे 'यज्ञकुंड' व 'क्रांतीच्या ठिणग्या' या होत. यज्ञकुंड या चरित्रकादंबरीमधून श्यामजी कृष्णा वर्मा पासून आतापर्यंतच्या एकूण नऊ क्रांतीकारकांची जीवन चरित्रे लिहिली असून क्रांतीच्या ठिणग्या या चरित्रामधून भारतात व परदेशात हिंदी सशस्त्र क्रांतीकारांनी स्वातंत्र्याकरीता काय प्रयत्न चालविले होते याचा आदर्श नव्या पिढीपूढे ठेवला आहे.

याच काळात मृणालिनी देसाई यांनी 'पूत्र मानवाचा' ही महात्मा गांधी यांच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबरी लिहिली. महात्मा गांधी जर वकील झाले असते तर त्यांना कुठलीच उणीव भासली नसती. देशातील प्रत्येक व्यक्तिंच्या समस्या सुटल्या असत्या गांधीना देशातील सर्वच गरीब जनतेचे वकील व्हायचे होते. त्यांच्या न्यायासाठी झगडायचे होते. गांधीजी ही आपल्या सारखेच माणूस होते याची प्रकट जाणीव म्हणाली की, मृणाली देसाई यांनी या चरित्रातून करून दिली आहे.

१९७० च्या काळात 'दुर्दम्य' ही चरित्रात्मक कादंबरी गंगाधर गाडगीळ यांनी लिहिली या चरित्रामधून लोकमान्य टिळक यांचे संमिश्र असे बहुरंगी व्यक्तिमत्त्व गाडगीळांनी साकारले आहे. लोकमान्य हे व्यक्तिमत्त्व कसे होते त्यांची धडपड, ध्यास कशासाठी होता. पारतंत्र्यात असलेल्या देशबांधवांच्यासाठी त्यांनी निकराचे कसे प्रयत्न केले याचे दर्शन गंगाधर गाडगीळ यांनी घडविले आहे. त्याप्रमाणे लोकमान्य टिळक यांच्यावर याच काळात १९७२ मध्ये न. र. फाटक यांनी 'लोकमान्य' या शीर्षकाची चरित्रात्मक कादंबरी लिहिली या चरित्रातून टिळकांनी राष्ट्रनिर्मितीचे कसे कार्य केले, ब्रिटिशांविरूद्ध असंतोष कसा निर्माण केला व स्वातंत्र्याची चळवळ कशी उभी केली त्यांनी स्वदेश, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार ही चतु:सूत्री मांडून लोकांच्यात स्वाभीमान कसा जागृत केला आपल्या विचारांच्या प्रचारासाठी त्यांनी अनेक भागातून दौरा कसा केला. त्यासाठी त्यांचा दिनक्रम कसा होता. याचे चित्रण करून त्यांचे आदर्शवत जीवन, सामाजिक सुधारणा, स्वार्थत्याग, स्वावलंबन, देशकल्याणाची तळमळ, धैर्य इत्यादी त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर या चरित्राद्वारे न. र. फाटक यांनी प्रकाश टाकला आहे.

१९६० या कालखंडातील चरित्रलेखकानी एकाच व्यक्तिमत्त्वावर विविध अंगानी लेखन केले आहे. 'प्रेषित' ही अशाच पद्धतीची न. म. जोशी यांनी महात्मा गांधी यांच्या

जीवनावर लिहिलेली चरित्र कादंबरी या कादंबरीमधून जोशी यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. गांधीजींच्या जीवनात स्वावलंबन, सत्य, अहिंसा, असहकार, निशस्त्र प्रतिकार सत्याग्रह, उपोषण या शब्दांना विशेष महत्त्व होते. या शब्दांच्या माध्यमातून गांधीनी भारतीय लोकांच्यामध्ये कसा आत्मविश्वास निर्माण केला व याच शब्दांच्या जोरावर देशाला स्वातंत्र कसे मिळवून दिले याचे दर्शन जोशी यांनी या चरित्रातून केले आहे.

याच काळातील आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे भा. द. खेर यांनी लिहिलेले 'अमृतपुत्र' या नावाचे चरित्र होय. या चरित्राचे नायक आहेत लालबहादूर शास्त्री शास्त्रीजींची मूर्ती लहान असली तरी किर्ती महान होती. त्यांनी 'जय जवान जय किसान' या एकाच घोषणेने संपूर्ण भारत हादरवून टाकला. त्यांनी भारताला उत्तम नेतृत्व दिले. त्यांचे आदर्श म्हणजे गांधीजी व पंडित नेहरू या दोन महान व्यक्ती होत्या. शास्त्री हे लोकशाहीचे ज्वलंत पुरस्कर्ते होते. त्यांची राहणी साधीच पण आदर्शवत होती. त्यांच्या तत्वनिष्ठ विचारांचे दर्शन भा. द. खेर यांनी या चरित्रातून केले आहे.

१९७४ मध्ये भा. द. खेर यांनी 'आनंदभवन' या शीर्षकाची आण्खी एक चरित्र कादंबरी लिहिली या कादंबरीतमधून त्यांनी नेहरू कुटुंबातील तीन व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. भारताचा स्वातंत्र्यानंतरचा इतिहास घडविणाऱ्या या कुटुंबातील मोतीलाल नेहरू, पंडित नेरू व इंदिरा गांधी यांचे राजकीय जीवन व महात्मा गांधी यांच्या सहवासात आल्यानंतर त्यांच्या विचारात झालेली क्रांती यांचे चित्रण खरे यांनी या चरित्रातून घडविले आहे.

या काळातील आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे जोत्स्ना देवधर यांनी लिहिलेले 'उत्तरयोगी' या नावाचे योगी अरविंद घोष यांच्या जीवनावर लिहिलेले असून त्यामधून अरविंद घोष यांच्या क्रांतीकारी लढ्याचे देशासाठी त्यांनी केलेल्या त्यागाचे तुरुंगवासाचे चित्रण केले आहे. तसेच स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी अध्यात्मिक योग बळाचे महत्त्व कसे पटवून दिले याचा वेध त्यांच्या चरित्रातून घेऊन घोष यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे.

महत्त्वाच्या चरित्रामध्ये विशेष उल्लेखनीय असे आणखी एक चरित्र म्हणजे तु. बा. नाईक यांनी 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज' या शीर्षकाचे लिहिलेले चरित्र होय या चरित्रात्मक कादंबरीमधून नाईक यांनी शाहू महाराज यांच्या कार्याचा संशोधनात्मक दृष्टिने थोडक्यात पण



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आटोपशीर आढावा घेतला आहे. शाहू महाराज यांचा जन्म,बालपण, शिक्षण, कौटुंबिक जीवन तसेच वयाच्या विसाव्या वर्षापासून त्यांनी कोल्हापूर संस्थानाची हाती घेतलेली सूत्रे व केवळ जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास यांच्या जोरावर त्यांनी केलेले समाजकार्य त्यांचा सर्व सामान्य माणसाविषयीचा कळवळा, त्यांचे चित्रण या चरित्रातून घडते. तसेच शाहू महाराज यांना बहुजनांचा राजा म्हणून ब्रिटीशांनी केलेली अवहेलना, दिलेला त्रास मानसिक छळ तसेच त्यांच्या जीवनातील गाजलेले वेदोक्त प्रकरण यांची सविस्तर माहिती या चरित्रामधून लेखकाने देऊन त्यांच्या संपूर्ण जीवनकार्यावर प्रकाश टाकला आहे.

या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौफेर जीवनावर विस्तृत लेखन करणारे चा. म. खैरमोडे यांच्या चरित्रलेखनाचा अग्रक्रमाने विचार करावा लागतो. खैर मोडे यांनी या काळात एकूण पाच खंड प्रकाशित केले या खंडातून त्यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनातील लौकीक प्राप्त अशा घटनांचा मागोवा घेऊन त्यांच्या संपूर्ण जीवनाबरोबर त्यांच्या समाज कार्यावर प्रकाश टाकला आहे.

याच काळातील आणखी एक खंडात्मक चरित्र म्हणजे साने गुरुजी यांच्यावर लिहिलेले गेलेले 'साने गुरुजी जीवनगाथा' अशा शीर्षकाचे चरित्र राजा मंगळवेढेकर यांनी लिहिले. या चरित्रामधून १८९९ ते १९५० पर्यंतच्या कालखंडातून त्यांच्या अनेक आठवणी त्यांची झालेली जडणघडण, शिक्षण मुलांच्यावर त्यांनी केलेले संस्कार, त्यातून मुलांच्यामध्ये त्यांनी निर्माण केलेला देशाभिमान, गांधीजीच्या नेतृत्वाखाली त्यांनी घेतलेली स्वातंत्र्य लढ्यातील उडी त्यांना झालेला तुरुंगवास व तुरुंगातही कर्तृत्वसंपन्न व्यक्तिच्या चारित्राचे त्यांना कसे लेखन केले याचा वेध घेतला आहे. तसेच शेवटच्या म्हणजे चौथ्या खंडातून त्यांनी केलेले सत्यागृह हरिजनांसाठीचा मंदिर प्रवेश तसेच त्यांनी केलेले 'श्यामची आई' या पुस्तकाचे लेखन व त्यांनी आंतरभारतीची संकल्पना या सर्व घटनांबरोबर त्यांच्या चरित्रामधून मंगळवेढेकरांनी त्या काळाचे दर्शनही घडविले आहे.

अशा प्रकारे १९६० ते १९७५ या काळात विविध अंगानी व विपुल प्रमाणात चरित्रनिर्मिती झाल्याचे दिसून येते.

## १९७६ ते २००० या कालखंडातील चरित्रात्मक कादंबरी

मराठी साहित्यात १९७६ नंतर कथा कविता, कादंबरी व नाटक या वाङ्मयाप्रमाणेच चरित्र या वाङ्मय प्रकाराची दर्जेदार निर्मिती झाली. अनेक सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्तिबरोबर कवी लेखक कलावंताची चरित्र लिहिली गेल्याची आढळतात. जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने लिहिली गेलेल्या चरित्रांची संख्या या काळात मोठी आढळते अनेक थोर चरित्रलेखक चरित्र लेखन करताना आढळतात.

या कालखंडात प्रसिद्ध झालेले व लक्षात घेण्यासारखे उल्लेखनीय असे चरित्र म्हणजे डॉ. उद्धव रसाळ यांनी लिहिलेले 'निष्काम कर्मयोगी संत गाडगेमहाराज' हे होय.

प्रस्तुत चरित्रातून त्या काळातील सामाजिक धार्मिक, शैक्षणिक परिस्थिती बिकट होती. समाज रूढी-परंपरा यांनी ग्रासला होता. अशा वेळी भजन किर्तनाच्या माध्यमातून साध्या सोप्या भाषेतील विचार समाजाला कसे दिले. जाती भेदावर अज्ञानावर टीका करून समाजाला गाडगेमहाराज यांनी सन्मार्गाला कसे आणले. त्याच प्रमाणे कुष्ठ रोग्यांची सेवा करून गरीबांसाठी आश्रमशाळा काढणाऱ्या संत गाडगेमहाराज यांच्या जीवनाचा वेध या चरित्रातून लेखकाने घेतला आहे.

त्याचप्रमाणे वसंत पोतदार यांनी ही १९८८ मध्ये गाडगेमहाराज यांच्यावर चरित्रलेखन केले आहे. तर मा. भि. काटकर यांनी गाडगेबाबा हे महाराष्ट्राच्या संत परंपरेत कसे बसतात त्यांचे कार्य कसे आहे हे संत गाडगेबाबा या चरित्रातून रेखाटले आहे. याचप्रमाणे द. ता.भोसले यांनी 'लोकोत्तर गाडगेबाबा जीवन आणि कार्य' या शीर्षकाचे गाडगेबाबांचे चरित्रसंपन्न जीवन या कादंबरीतून चित्रित के ले आहे.

याच काळात देशकार्यात स्वत:ला झोकून देणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावर अनेक नामवंत लेखकांनी चरित्र लेखन केले. सावरकरांचे जीवन म्हणजे धगधगते यज्ञकुंड होते. त्यांनी चाफेकरांचे अपूर्ण कार्य पूर्ण केले. त्यांनी स्वातंत्र्याचा ध्यास घेतला होता. त्यासाठी त्यांनी अंदमान बेटावर पन्नास वर्षांची शिक्षा भोगली पण ते स्वस्त बसले नाहीत. त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याचा प्रवास वि. स. वाळिंबे यांनी 'सावरकर' या शीर्षकाच्या चरित्रामधून घेतला आहे. त्याचप्रमाणे 'स्वातंत्र्यवीर सावरकर वादळी जीवन' या शीर्षकाचे ज. द. जोगळेकर यांनीही चरित्र लेखन केले आहे.

आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे 'सावित्री ज्योती' इंदूमती केळकर यांनी लिहिलेले सावित्री फुले व त्यांचे पती जोतीराव फुले या दाम्पत्यांची जीवन कहाणी या चरित्रातून लिहिली आहे. सावित्रीबाई फुले यांचा काळ म्हणजे सनातनी कर्मठ रूढीप्रिय समाज होता या काळात स्त्री शिक्षणाला प्रखर विरोध होता पण या काळात या प्रथेविरूद्ध लढा देण्याचे काम सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी केले. सावित्रीबाईना त्यासाठी अनेक संकटाना सामोरे जावे लागले. अंगावर शेण, चिखल, दगडगोटे यांचा वर्षाव झाला पण ते त्या डगमगल्या नाहीत. त्या जोतीरावांच्याकडून प्रथम शिकल्या व आपले स्त्री शिक्षणाचे कार्य पूर्ण केले. या त्यांच्या संपूर्ण कार्याचा शोध या चरित्राने घेतला आहे. त्याचबरोबर सावित्रीबाई यांच्या हि. गों. बनसोडे यांनी 'आभाळाएवढी' व मा. गो. माळी यांनी 'क्रांतीज्योती' अशा शीर्षकाच्या चरित्रात्मक कादंबऱ्या लिहून स्त्री चरित्रामध्ये मोलाची भर घातली आहे.

याच काळात नाटककार राम गणेश गडकरी यांच्यावर माधव गडकरी यांनी चरित्रात्मक कादंबरी लिहून त्यांच्या संपूर्ण कार्याबरोबर त्यांच्या साहित्याचा वेध घेतला आहे. हे चरित्र त्यांनी राम गणेश गडकरी यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने लिहिले आहे.

मराठीतील चरित्रात्मक कादंबरीत ज्या चरित्रकारांनी आपल्याला भावलेल्या चरित्रनायकावर चरित्र लेखन केले आहे. त्या चरित्र नायकांच्या पत्नीचाही पतीबरोबर समाजकार्यात मोलाचा वाटा असतो. 'रमाई' ही बंधुमाधव यांनी लिहिलेली डॉ. आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई यांच्यावर चरित्र लेखन केले आहे. त्यांचे आंबेडकरांच्या जीवनातील स्थान, आंबेडकर शिक्षणासाठी बाहेर असताना सांभाळलेला संसार आंबेडकरांचे समाजकार्य करीत असताना त्यांनी कोणताच अडथळा आणला नाही. उलट रमाबाईंनी आंबेडकरांना साथ दिली. त्यांच्या जीवनाचा आढावा बंधुमाधव यांनी या चरित्रातून घेतला आहे.

या काळातील आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे थोर साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांचे त्यांच्या बंधुने शंकर भाऊ साठे यांनी लिहिलेले 'माझा भाऊ अण्णाभाऊ' हे चरित्र होय. अण्णांचे बालपण त्यांच्या भावाने जवळून पाहिले होते. त्यांच्या जीवनाचा दाहक प्रवास शंकर साठे यांनी या चरित्रामध्ये टिपला आहे. लौकिक अर्थान ज्याला आपण शिक्षण म्हणतो असे शिक्षण कोणत्याच मानवी शाळेतील शिक्षण अण्णा शिकले नाहीत. ते निसर्गातील अनुभवाने मोठे झाले. शाळेच्या पहिल्याच दिवशी शिक्षकाने अण्णांचा अंगठा फोडून काढला होता. पण

त्याच हाताने अण्णांनी मराठी साहित्य क्षेत्राची फार मोठी सेवा केली. अण्णाचे समाजकार्य फार मोठे आहे. समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी अनेक आंदोलने केली. राष्ट्रसेवादलात भरीव कार्य केले. मुंबई ही कोणाची आहे या वादात मुंबई ही महाराष्ट्राचीच कशी आहे हे पटवून देण्यासाठी मुंबईवर अनेक पोवाडे रचले. अण्णांचे साहित्य क्षेत्र विशाल आहे. त्यांनी कथा, कादंबरी, तमाशा इत्यादी साहित्य क्षेत्रात भरपूर लेखन केले त्यावेळच्या पडत्या काळात तमाशाला उर्जितावस्था आणून दिली.

अशा प्रकारे समाज व साहित्याच्या क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या अण्णाभाऊंच्या जीवन कार्याचा परिचय या चरित्रातून होतो.

१९७५ नंतरचा कालखंड म्हणजे साहित्याच्या क्षेत्रात नवा नावारूपाला आलेल्या साहित्यकांचा काळ आहे. या साहित्यकांच्या कार्याची नोंद अनेक चरित्रकारांनी घेतली आहे. मराठी नवकाव्याचे जनक म्हणून ओळखले गेलेल्या बा. सी. मर्ढेकर यांचे कवी यशवंत मनोहर यांनी चरित्रलेखन केले आहे. या चरित्रातून त्यांचे बालपण, त्यांच्या जीवनाची जडणघडण, व त्यांच्या साहित्याचा परिचय करून दिला आहे. त्याच्या स्वभावदर्शनाबरोबर त्यांचे काव्य समीक्षण असे स्वरूप असणारे डॉ. यशवंत मनोहर यांच्या चरित्राचा प्रभाव नंतरच्या काळातील चरित्रनिर्मितीवर बराच काळ राहिला.

या काळातील आणखी एका महत्त्वपूर्ण चरित्राचा उल्लेख करावा लागेल असे चरित्र म्हणजे बा. ग. पवार यांनी लिहिलेले ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्रामधून अण्णांचे मूळ घराणे, बालपण, शिक्षण पुढे रयत शिक्षण संस्थेची स्थापना व विकास, त्यांच्या कमवा व शिका या योजनेचे महत्त्व ग्रामीण भागात गरीब, कष्टकरी कामगारांच्या, शेतमजूरांच्या मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून ग्रामीण भागात अनेक शाळा स्थापन केल्या, वसतिगृह स्थापन केली यातून ते ग्रामीण शिक्षणाचे जनक कसे ठरतात ते या चरित्रामधून दिसून येते.

या चरित्राबरोबर अनेक चरित्रकारांनाही अण्णांचे व्यक्तित्व भावले त्यांनी ही आपल्या लेखनातून अण्णांच्या जीवनकार्याचे दर्शन घडविले आहे. त्यामध्ये 'मला समजलेले कर्मवीर' हे बा. म. ठोके यांचे, तसेच ग्रामीण साहित्यिक द. ता. भोसले यांचे कुमारांचे कर्मवीर या चरित्राचा समावेश होतो. याच काळात लिहिलेले 'सहा थोर पुरुष' हे न. र. फाटक यांनी


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

लिहिलेले चरित्र म्हणजे सामाजिक रूढी परंपरा विरूद्ध आवाज उठवून राष्ट्रनिर्मितीला हातभार लावण्याचे कार्य ज्या महत्त्वाच्या राष्ट्रपुरुषांकडून घडले असे महान पुरुष म्हणजे लोकहितवादी, जोतिबा फुले, भांडारकर, नामदार गोखले, लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती रानडे यांच्या कार्याचा वेध घेणारे चरित्र लिहून मराठी चरित्रात एकत्रित असे चरित्र लेखन न. र. फाटक यांनी केले.

याच काळात लिहिलेले 'गूढयात्री' हे विद्या सप्रे-चौधरी यांनी लिहिलेले चरित्र असून प्रस्तुत चरित्रामधून साहित्यिक जी. ए. कुलकर्णी यांच्या जीवनावर चरित्र लेखन केले आहे. त्यातून त्यांनी जी. ए. च्या जीवनाचा वेध घेतला आहे. जी. ए. ना जीवनात अनेक कटू अनुभव आले. परंतु हताश, निराश, व्यक्तिंना कलेचा आस्वाद घेता यावा म्हणून त्यांनी आजन्म कलेचे व्रत घेतले त्यांची मानवी जीवनाच्या गाभ्यापर्यंत पोहचण्यासाठी त्यांची गुढमार्गावरील शोध यात्रा कशी होती याचे दर्शन विद्या सप्रे-चौधरी यांनी घडवले आहे.

विद्या सप्रे-चौधरी यांनी आणखी एक चरित्र या काळात लिहिले ते म्हणजे 'अर्ध्यदान' हे होय या चरित्रातून त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय करून दिला आहे. त्यांची हत्या राजकीय वर्तुळात झाली पण त्या आजही आपल्या कार्याने अमर आहेत. संपूर्ण भारताची सत्ता त्यांच्या हाती होती पण त्या माणसासी माणसाप्रमाणे वागल्या एक स्त्री असूनही पुरुषांपेक्षाही संबंध भारताच्या जनतेचे ओझे त्यांनी सोसले त्यांनी जनतेच्या हितासाठी स्वत:ला वाहून घेतले होते. या त्यांच्या सर्व कार्याचे दर्शन या चरित्राच्या माध्यमातून लेखिकेने घडविले आहे. तसेच इंदिरा गांधी यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे चरित्र राजा मंगळवेढेकर यांनी 'इंदिरा गांधी' अशा शीर्षकाची कॉंग्रेस शताब्दी निमित्त सुबोध असे चरित्रलेखन केले आहे.

या कालखंडातील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण चरित्र म्हणजे रविंद्र भट यांचे 'सत्यं शिवं सुंदरम' हे होय. प्रस्तुत चरित्रामधून लेखकाने स्वामी विवेकानंदाच्या तत्वज्ञानाचा वेध घेतला आहे. विवेकानंद भारत फिरून आल्यावर माणसाना आवश्यक असणारी माणूसकी त्यांना कुठेच दिसली नाही. म्हणून त्यांनी प्रथम माणूस घडवायला हवा, स्वातंत्र्याचा नेमका अर्थ त्याला समजायला पाहिजे अशी त्यांची विचारधारा होती. त्यांनी एकोणिसाव्या शतकातील सामाजिक रूढी, परंपरा जवळून पाहिल्या होत्या. त्या त्यांना मान्य नव्हत्या त्यांनी अनिष्ठ

रूढींना विरोध केला. अशाप्रकारे त्यांनी व्यापक विश्व धर्माचा पुरस्कार केला. 'सत्यं शिवं सुंदरम्' या तत्त्वाचा पुरस्कार केला. धर्म चालीरितीत नसून वैश्विक एकात्मता साधणे हाच खरा धर्म अशी शिकवण दिली. अशा विवेकानंदाची जीवनगाथा रविंद्र भट यांनी लिहिली आहे.

१९७५ नंतरचा कालखंड हा संत चरित्र लेखनालाही अपवाद नाही या काळात लिहिले गेलेले महत्त्वाचे चरित्र म्हणजे अरुणा ढेरे यांचे 'महाद्वार' हे संत चोखामेळा हे शुद्र जातीत जन्माला आलेल्या संताचे चरित्र लिहून मराठी संत चरित्रात महत्त्वपूर्ण अशी मौलिक भर घातली आहे. या चरित्रातून संत चोखामेळा यांच्या विठ्ठल भक्तीसह त्यांच्या भावजीवनाचा वेध या चरित्राने घेतला आहे.

याच कालखंडात ख्यातनाम वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी 'मुक्तीगाथा महामानवाची' या शीर्षकाची चरित्रात्मक कादंबरी लिहिली असून या चिरत्रामधून अरविंदाच्या जीवनाचा संपूर्ण परिचय करून दिला आहे. त्यांच्या वडिलानी लहानपणी शिक्षणासाठी बाहेर ठेवले. त्यांनी शिक्षण घेऊन पाश्चात्य साहित्याचा अभ्यास केला. गॅरीबाल्डी व मॅझिनी यांच्या चरित्रांचा प्रभाव पाडला. त्यातून ते देशभक्तीच्या विचाराने भारावले ते खूप बुद्धीवंत असल्याने आय. सी. एस. झाले पण ब्रिटीशांनी त्यांना अधिकारी पदाच्या यादीतून मुद्दाम वगळले त्यातून त्यांनी स्वत:ला कसे सावरले, त्यांनी बडोदा संस्थानात अनेक पदे कशी मिळवली, तसेच देशस्वातंत्र्या विषयी त्यांचे व्यापक विचार कसे होते. त्यासाठी त्यानी आपले तात्वीक विचार कसे मांडले आहेत या सर्वांचा वेध त्यांच्या जीवनाबरोबर लेखकाने करून दिला आहे.

याच काळात य. दि. फडके यांनी 'आगरकर' हे चिरित्र गोपाळ गणेश आगरकर यांच्या जीवनावर लिहिले या चरित्रामधून आगरकरांच्या बरोबर तत्कालिन समाजजीवनाचे दर्शनही घडविले आहे. आगरकरांचा जन्म, बालपण, शिक्षण व पुढे त्यांनी केलेली समजासुधारणा, त्यांनी भारतीयांच्या शिक्षणाबद्दल मांडलेले विचार इत्यादीचे चित्रण केले आहे. ते आपले विचार निबंधमालेतून परखडपणे मांडत. त्यांनी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. तसेच डेक्कन एज्युकेशन सोसायटी विकासातील त्यांचा सहभाग इत्यादी घटनांची फडके यांनी नोंद घेऊन त्यांनी शैक्षणिक व सामाजिक सुधारणेला अग्रक्रम दिला होता. त्यातून

त्यांची समाजाबद्दलची तळमळ दिसून येते. या त्यांच्या समाजकार्याबरोबर त्यांच्या इतर लेखन साहित्याचा वेध फडके यांनी घेऊन त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे.

याच काळातील आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे 'महात्मा' हे रविंद्र ठाकूर यांनी लिहिलेले महात्मा जोतीराव फुले यांच्या जीवनावर रचलेली कादंबरी असून फुले यांनी केलेल्या समाज सुधारणा शैक्षणिक कार्य हे विधायक कार्य करीत असताना सनातनी कर्मठ लोकांनी त्यांना कशा प्रकारे त्रास दिला पण त्या त्रासाला न डगमगता कशाप्रकारे तोंड दिले. तसेच त्यांची अविरत कष्ट करण्याची वृत्ती या सर्वांचे चित्रण रविंद्र ठाकूर यांनी या कादंबरीमध्ये केले आहे.

महात्मा फुले यांच्यावर या काळात आणखी काही चरित्रांची निर्मिती झाली. त्यामध्ये 'जोतीपर्व' हे नागनाथ कोत्तापल्ले यांनी तसेच 'महात्मा फुले' हे धनंजय कीर यांनी व 'युगपुरुष महात्मा जोतीराव फुले' हे बा. ग. पवार यांनी चरित्र लेखन केले आहे.

या काळातच लिहिलेली आणखी चरित्रात्मक कादंबरी म्हणजे 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' ही डॉ. शंकरराव कदम यांनी लिहिली या चरित्रामध्ये शिंदे यांची सेवाभावी वृत्ती तसेच त्यांनी दिलेले समतेला प्राधान्य यांचा उहापोह या चरित्रामध्ये करून त्यांनी फुले गांधीजी व आंबेडकर यांचे विचार कसे आचरणात आणले यावर प्रकाश टाकला आहे.

अशाप्रकारे मराठी साहित्यात १९७६ नंतर चरित्र वाङ्मयाची दर्जेदार निर्मिती झाली.अनेक सामाजिक शैक्षणिक व राजकीय व्यक्तिंबरोबर कवी, लेखक कलावंताच्या जीवनावर या काळात चरित्र लेखन झाल्याचे दिसून येते.

**१९६० नंतरची चरित्रात्मक कांदबरी कालखंड तिसरा २००१-२०१०**

अभ्यासाच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या विभागणी मध्ये २००१-२०१० या काळातील महत्त्वाच्या उल्लेखनीय चरित्राचा आढावा घेताना अधिक चिकित्सक वृत्तीतून या काळात चरित्रनिर्मिती होत असल्याचे आढळते. या काळात सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील व्यक्तिंबरोबर या ही काळात कवी कलावंत लेखक तसेच कृषिक्षेत्रातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तिंची चरित्रे मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. अशा महत्त्वाच्या उल्लेखनीय चरित्रांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

'विनोबा' हे चरित्र भ. ग. बापट यांनी या काळात लिहिले असून त्यांनी विनोबा भावे यांच्या चरित्रातून त्यांच्या जीवनाचा वेध घेतला आहे.विनोबांच्या वर शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांचे वाचन अफाट होते. त्यांचे आदर्श म्हणजे रामदास, बुद्ध व शंकराचार्य हे महापुरुष होते ते गांधी विचाराने भारावलेले होते.

विनोबांनी भूदान चळवळ करून हजारो भूमिहिनांना भूदान केले. तसेच गो हत्या थांबवावी यासाठी आमरण उपोषण केले. यासर्व घटनांसह बापट यांनी विनोबांच्या जीवनाचरित्राचा मागोवा घेतला आहे. तसेच या काळातील आणखी एक उल्लेखनीय चरित्र म्हणजे एस. एम. जोशी स्वातंत्र्यसेनानी व समाजवादी नेते हे ग. प्र. प्रधान यांनी लिहिले असून या चरित्रामधून प्रधान यांनी जोशी यांची महाराष्ट्राच्या जडणघडणीत तसेच देशस्वातंत्र्याच्या काळात जे योगदान दिले तसेच राष्ट्र सेवा दलातील त्यांचा सक्रीय सहभाग तसेच जीवनावरील तत्त्वनिष्ठा भूमिका यावर प्रकाश टाकून त्यांच्या व्यक्तिचरित्राचा वेध या चरित्रातून घेतला आहे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीतील शिल्पकार ठरलेले आणखी एक व्यक्तिमत्त्व म्हणजे साने गुरूजी यांच्या जीवनावर चरित्र लिहिले गेले. 'सेनानी साने गुरूजी' शीर्षकाचे चरित्र चरित्रकार राजा मंगळवेढेकर यांनी लिहिले असून या चरित्रातून त्यांच्या जीवनाची जडणघडण, शिक्षण, शिक्षण घेताना आलेल्या अनेक अडच्णी, मातृवियोग तसेच ते तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी व शिक्षक, गुरूजींची राजनीती, तसेच त्यांचे आंतरभारतीचे स्वप्न, इत्यादींसह नोंद घेऊन त्यांनी तरुणांच्या मनामध्ये देशाभिमान व राष्ट्राभिमान निर्माण व्हावा यासाठी अनेक थोर पुरुषांची चरित्रे लिहिली. दलितांसाठी पंढरपुरचे विठ्ठल मंदिर खुले व्हावे म्हणून त्यांनी आमरण उपोषण केले. त्यांना भारताच्या ऐक्याचा कसा ध्यास घेतला. त्यासाठी त्यांनी केलेली आंदोलने व सहभाग या सर्व घटनांची नोंद घेऊन त्यांच्या जीवनाबरोबरच त्याकाळातील सामाजिक परिस्थितीवर या चरित्रातून मंगळ वेढेकर यांनी प्रकाश टाकला आहे.

महाराष्ट्र घडविण्यात ज्यांनी मोलाचे योगदान दिले असे उमदे व्यक्तिमत्त्व म्हणजे क्रांतीसिंह नाना पाटील 'क्रांतिसिंह नाना पाटील : एक अखंड क्रांतीकारक' हे चरित्र भारत पाटणकर यांनी नाना पाटील यांच्या जीवनावर लिहिले प्रस्तुत चरित्रामधून त्यांनी देशाला आपले संपूर्ण जीवन वाहणाऱ्या नाना पाटील यांच्या जीवनावर चरित्र लेखन करून त्यांच्या कार्याचा मागोवा घेतला आहे. देशस्वातंत्र्याच्या कामी यावे म्हणून नोकरीचा त्याग करणारे

नाना पाटील यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. ते भूमीगत राहून कार्य करीत, तरुणांना वास्तव्याची जाणीव करून देत ते नेहमी ग्रामीण भाषेत भाषण देऊन जनतेला आपलेसे करून घेऊन देशाविषयी लोकांच्या मनामध्ये अभिमान वाढवत नाना नेहमी कष्टकरी कामगार, शेतकरी शेतमजूर, दीन, दलित यांच्या बाजूने आपले विचार मांडीत व त्यातून नानांचे क्रांतीकारक विचार कसे रूजले. या त्यांच्या मौलिक विचारासह नानांच्या जीवनातील सर्व घटनावर प्रकाश टाकण्याचे कार्य या चरित्राने केले आहे.

त्याचप्रमाणे साहित्याच्या क्षेत्रातील शिल्पकार ठरलेले साहित्यिक कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांनी मराठी साहित्यात भरीव कार्य केल्याने त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. अशा शिरवाडकरांच्या जीवनावर त्यांचे लहान बंधू के. र. शिरवाडकर यांनी 'तो प्रवास सुंदर होता; कुसूमाग्रज वि. वा. शिरवाडकर' या शीर्षकाचे चरित्र लेखन केले.

या काळाला संत चरित्रेही अपवाद नाहीत या काळात लिहिले गेलेले महत्त्वाचे संत चरित्र म्हणजे 'समग्र तुकाराम दर्शन' हे किशोर सानप यांनी लिहिले असून या चरित्रग्रंथातून संत तुकाराम यांच्या समग्र जीवन कार्याचा वेध घेणारी ही एकमेव चरित्रात्मक कादंबरी आहे.

याच कालखंडातील आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे पद्मभूषण डॉ. जे. पी. नाईक चरित्र व काही ही प्रा. श्रीकांत नाईक यांनी संपादन केलेले चरित्र असून शिक्षणतज्ञ, तत्वचिंतक, प्रशासक, नियोजक तसेच गांधीवादी विचारसरणीचे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. जे. पी. नाईक यांच्या जीवन कार्याचा परामर्श या चरित्रामधून घेतला आहे. त्याचप्रमाणे याच काळात 'प्रतिभावंत शिक्षणतज्ञ : डॉ. जे. पी. नाईक' हे सागर देशपांडे यांनी चरित्रलेखन केले. या चरित्रामधून डॉ. जे. पी. नाईक हे असामान्य शिक्षण वेते होते. ते शिक्षकांचा शिक्षक होते. ते लोकनिष्ठ होते या त्यांच्या सर्व व्यक्तिमत्त्व पैलूंचा उल्लेख देशपांडे यांनी या चरित्रातून करून दिला आहे.

मराठी चरित्रात्मक कादंबरीमध्ये महत्त्वाचे नेते चरित्रनायक झाले आहेत. या काळात लिहिलेली 'सारथी' ही पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या जीवनावर हेमंत देसाई यांनी चरित्रात्मक कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीतून पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी भारताचा आर्थिक नकाशा कशाप्रकारे बदलून टाकला तसेच त्यांचा अर्थमंत्री पदापासून ते पंतप्रधान पदापर्यंतचाप्रवास आणि देशापुढील आव्हान यांचा परामर्श या कादंबरीतून देसाई यांनी घेतला

आहे. त्याचप्रमाणे याच काळात लिहिलेले आणची एक चरित्र म्हणजे भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती यांचे वयैक्तिक व राजकीय जीवनप्रवासाचा मागोवा घेतलेले चरित्र राष्ट्रपती : प्रतिभाताई पाटील या शीर्षकाचे डॉ. छाया महाजन यांनी लिहिले.

याच काळात लिहिलेले आणखी एक महत्त्वाचे चरित्र म्हणजे 'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन' हे वि. र. काळे यांनी लिहिलेले चरित्र असून या चरित्रामधून वि. र. काळे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे शिक्षणतज्ञ होते. तसेच त्यांनी राजकारण व तत्वज्ञान या क्षेत्रात जे योगदान दिले आहे. त्याचा वेध या चरित्रातून घेतला आहे. त्याचप्रमाणे या काळातील आणखी एक उल्लेखनिय चरित्र म्हणजे 'शांततेचे नोबेल पारितोषिक विजेते बराक ओबामा' हे रवींद्र कोल्हे यांनी लिहिलेले चरित्र असून जगाचा इतिहास बदलवून नवा इतिहास घडविण्याऱ्या बराक ओबामा यांनी केलेल्या कार्याचा मागोवा या चरित्रातून कोल्हे यांनी घेतला आहे.

मराठी चरित्रामध्ये आपल्याला भावलेले व्यक्तिमत्त्व मग ते कोणत्याही काळातील असो त्या चरित्र नायकाला चरित्रकार आपल्या लेखनाद्वारे लोकांसमोर नव्याने मांडीत असतो याच प्रकारचे आणखी एक चरित्र म्हणजे 'दिव्यत्त्वाची जेथे प्रचिती' हे सुषमा नानोटी यांनी लिहिलेले चरित्र असून प्रस्तुत चरित्रातून श्री संत ज्ञानेश्वर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. संत ज्ञानेश्वरांना फार कमी आयुष्यच लाभले या लहान वयातच त्यांनी लोकांना अध्यात्माद्वारे सन्मार्गावर आणण्याचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा वेध या चरित्रातून सुषमा नानोटी यांनी घेतला आहे.

अगदी अलिकडील म्हणजे सन २०१० मध्ये लिहिलेले आणखी एक चरित्र म्हणजे 'चक्र ते चरखा' हे दिनकर जोशी यांनी लिहिलेले व सुषमा शाळीग्राम यांनी अनुवादित केलेले चरित्र आहे. प्रस्तुत चरित्रामध्ये श्रीकृष्ण आणि महात्मा गांधी या दोन महान विभुतींच्या जीवन-विचार व कार्य यावर प्रकाश टाकला आहे.

अशा प्रकारे १९६० नंतरच्या चरित्रकारांनी आपल्याला भावलेल्या चरित्रानायकाविषयी साधनांचे कष्टपूर्वक संकलन करून त्यांचे व्यक्तित्त्व सत्य स्वरूपात मांडलेले आहे. चरित्रनायक हे माणूस म्हणून कसे जगले हे आपल्या लेखनातून वाचकांच्या मनावर ठसविण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. १९६० नंतरच्या चरित्रामध्ये विविध



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कार्यक्षेत्रातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तींची अभ्यासपूर्ण चरित्रे या काळात लिहिली गेल्याने मराठी चरित्र वाङ्मयाची कक्षा आणखीनच विस्तारली आहे. यामध्ये दिवसे दिवस नाविन्यपूर्ण चरित्रांची भर पडत आहे. त्यामुळे चरित्र वाङ्मय प्रकार समृद्ध व संपन्न होत आहे. कर्तृत्ववान व्यक्तींच्या काळातील समाजाची सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती त्यांची वैचारिक पातळी त्यानुसार प्राप्त परिस्थिती मध्ये चरित्रनायकाने कशाप्रकारे सामावून घेऊन आपले कार्य पार पाडले याचा शोध चरित्रकाराने घेतला आहे.

याच पार्श्वभूमीवर २००७ मध्ये 'तुकयाची आवली' ही चरित्रात्मक कादंबरी मंजुश्री गोखले यांनी लिहिली. संत तुकाराम यांची पत्नी 'आवली' हिच्या जीवनावर आधारित ही चरित्रात्मक कादंबरी असून संत तुकाराम यांच्या जीवनात मोलाचा वाटा उचलणारी पत्नी 'आवली' हिचा त्याग फार मोठा आहे.

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. या भूमीत संताना अग्रगण्य मान आहे. सामान्य जनांची ती श्रद्धास्थाने आहेत. संताच्या कार्याचा प्रभाव जन मनावर पिढ्यान् पिढ्या टिकून राहतो. ईश्वर, जीव आणि जगत या विषयीचे ज्ञान, त्यांची समाजाविषयी तळमळ, त्यांचा समाजाविषयी दृष्टिकोन या गुणांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणखी उजळ होत जाते. आणि हा उजाळा देण्याचे कार्य १९६० नंतरच्या संत साहित्यावरील चरित्रात्मक कादंबरीतून दिसून येतो. असे चरित्रात्मक लेखन करणारे चरित्रकार म्हणजे डॉ. निर्मलकुमार फडफुले, डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. सदानंद मोरे, वि. भि. कोलते, डॉ. गो. म. कुलकर्णी दिलीप चित्रे त्याचप्रमाणे मुकुंद दातार, डॉ. अनिल गवळी, डॉ. गं. बा. सरदार यासारख्या श्रेष्ठ अभ्यासकांनी संत तुकाराम यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे ग्रंथ लिहिले आहेत. त्याचे जीवन लोकमानसापर्यंत पोहचवले आहे. त्याच प्रमाणे मंजुश्री गोखले यांनीही 'तुकयाची आवली' ही चरित्रात्मक कादंबरी लिहून मोलाची अशी वैशिष्ट्यपूर्ण भर टाकली आहे.

समारोप :

आतापर्यंत आपण १९६० ते २०१० या काळातील चरित्र ग्रंथांचा आढावा घेतला. पुढील प्रकरणात लेखिका मंजुश्री गोखले यांचा सर्वांगीण परिचय करून घ्यावयाचा आहे.

संदर्भ :


| | | | |
|---|---|---|---|
| १) | मोटे, कृष्णाबाई | : | '१९६८ मधील चरित्रे, आत्मचरित्रे व आठवणी' (लेख), ललित अंक मे, १९६९, पृष्ठ क्र.२८,२९ |
| २) | गाडगीळ, गंगाधर | : | ललित अंक जून १९९७ पृष्ठ क्र. ५९ |
| ३) | डॉ. कऱ्हाडे, सदा | : | 'चरित्र-आत्मचरित्र' लोकवाङ्मय, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७६ पृष्ठ क्र. ६७,६८ |
| ४) | रावते, ग. का. | : | 'मराठी चरित्रे : मुलतत्त्वे व समीक्षा', समर्थ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९८५ पृष्ठ.क्र. ८२ |
| ५) | बोरगावकर व. रा. | : | 'प्राचीन मराठीतील चरित्र लेखन' पृष्ठ क्र. २७८ |




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.